दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३५१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : १८ सप्टेंबर २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : सप्तमी तिथी (दुपारी ०१:०० पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (रात्री १०:४४ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र योग : प्रीति योग (दुपारी ०१:३४ पर्यंत) त्यानंतर आयुष्मान योग करण : वाणीजा करण (दुपारी ०१:०० पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण चंद्र राशी : वृश्चिक राशी (रात्री १०:४४ पर्यंत)

### तिघा गुन्हेगारांना लोणीकंद पोलिसांनी केली अटक

पुणे : चिकन सेंटरमध्ये शिरुन तिघांनी कामगाराला मारहाण करुन काऊंटरवर ठेवलेल्या अंड्याचे ट्रे फोडून दुकानाची तोडफोड करुन गल्ल्यातील ३१ हजार रुपये चोरुन नेणार्या तिघांना लोणीकंद पोलिसांनी अटक केली आहे. कृष्णा सुखदेव डोंगरे (वय ४९, रा. दत्तसमुद्धीनगर, लोणीकंद, मुळ रा. कोथरबन, ता. वडवणी, जि. बीड), सौरभ कृष्णा डोंगरे (वय २३, रा. दत्तसमुद्धीनगर, लोणीकंद), मनोज लहु ठोसर (वय ३२, रा. सद्गुरु कॉलनी, वाकड, मुळ रा. रोहकल ता. परांडा, जि. धाराशिव) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. याबाबत गणेश तानाजी भोगावडे (वय ५२, रा. लोणीकंद) यांनी फिर्याद दिली आहे.

## सारांश वृत्त

### शेतकऱ्याची पिके करपतात, सरकार पंचांग पाहते? पंचनाम्याच्या ‘मुहूर्ता’वरून महाराष्ट्राच्या कारभाराची परीक्षा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात असताना पीक नुकसानीच्या पंचनाम्यांसाठी ५ ऑक्टोबरची तारीख निश्चित झाल्याच्या मुद्द्यावरून सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील आंदोलनात उद्धव ठाकरे यांनी याच मुद्यावर सरकारला लक्ष्य केले. आत्महत्या करणारा शेतकरी पंचांग पाहत नाही; पंचनाम्याचे मुहूर्त खड्ड्यात घाला, अशी टीका त्यांनी केली.

राजकीय आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेवले, तरी प्रश्न अत्यंत साधा आहेपिकांचे नुकसान आज होत असेल, तर पचनाम्याची प्रक्रिया इतकी पुढे का ढकलली जाते?

शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक सरकारी आदेशाची वाट पाहत नाही. पावसाचा खंड, वाढता उत्पादनखर्च, कर्जाचा ताण, चारा-पाण्याची चिंता आणि बाजारभावातील अनिश्चितता या सगळ्याचा परिणाम त्याच्या उत्पन्नावर होतो. अशा वेळी मदतीसाठी आवश्यक असलेली प्रशासकीय प्रक्रिया वेळेत सुरू होणे अपेक्षित आहे.

कर्नाटकाने १७ ऑगस्टला दुष्काळ जाहीर केल्याचा दाखला देत महाराष्ट्रातील विलंबावर ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. मात्र अशा तुलनेबरोबर महाराष्ट्रातील दुष्काळ जाहीर करण्याची अधिकृत निकषाधारित प्रक्रिया, प्रत्यक्ष पर्जन्यमान आणि पीकस्थिती यांचाही सार्वजनिक आढावा घेणे आवश्यक आहे.

खरा मुद्दा केवळ पंचनाम्याचा नाही. पंचनामा झाल्यानंतर मदत कधी मिळणार? नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत ती पोहोचणार कशी? आणि तोपर्यंत त्याचा आधार कोण? या प्रश्नांची उत्तरे सरकारने स्पष्टपणे द्यायला हवीत.

वीजपुरवठ्याबाबतही मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शेतीला पुरेसा वीजपुरवठा, पिकांचे संरक्षण, पशुधनासाठी चारा आणि संकटग्रस्त कुटुंबांना तातडीची मदतही प्रशासनाची नियमित जबाबदारी आहे.

# मतदारांचा कौल की आमदारांचा सौदा? लोकशाहीच्या थट्टेला आता लगाम हवा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

निवडणूक म्हणजे केवळ मतदानाचा दिवस नाही; तो मतदार आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील विश्वासाचा घटनात्मक करार असतो. एखाद्या उमेदवाराला पक्षाच्या चिन्हावर निवडून दिल्यानंतर काही आठवड्यांतच त्याने राजीनामा द्यावा, दुसऱ्या पक्षात प्रवेश करावा आणि त्याच मतदारसंघातून पुन्हा पोटनिवडणूक लढवावी, ही बाब केवळ राजकीय पक्षांतरापुरती मर्यादित राहत नाही. ती थेट मतदाराच्या कौलाच्या अर्थालाच प्रश्न विचारते.

याच गंभीर मुद्द्यावर मद्रास उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याबाबत विचार करण्यास सांगितले आहे. निवडणुकीनंतर लगेच राजीनामा देऊन दुसऱ्या पक्षाच्या चिन्हावर त्याच मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवण्याची परिस्थिती लोकशाहीची थट्टा ठरू शकते, अशी न्यायालयाची मौखिक टिप्पणी आहे. न्यायालयाने हेही अधोरेखित केले की आमदाराला राजीनामा देण्याचा अधिकार असला, तरी त्याने निवडून दिलेल्या मतदारांच्या अधिकारांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

हा प्रश्न आज तमिळनाडूपुरता नाही. भारतीय राजकारणाच्या बदलत्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात पक्षांतराचे नवे मार्ग शोधले जात असतील, तर त्याचा परिणाम उद्या कोणत्याही राज्यात दिसू शकतो. निवडणुकीत मिळालेला जनादेश हा एखाद्या व्यक्तीचा वैयक्तिक मालकीहक्क नाही. मतदाराने व्यक्ती, पक्ष आणि धोरण यांचा विचार करून दिलेला कौल असतो. त्या कौलाच्या काही दिवसांतच राजकीय समीकरण बदलून पुन्हा मतदारांसमोर जाण्याची वेळ आणली गेली, तर त्या प्रक्रियेचा आर्थिक आणि नैतिक भार शेवटी जनतेलाच सहन करावा लागतो.

विशेषत: पोटनिवडणुकीचा खर्च सार्वजनिक तिजोरीतून होतो. त्यामुळे एखाद्या लोकप्रतिनिधीच्या वैयक्तिक राजकीय निर्णयामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची सार्वजनिक आर्थिक जबाबदारी कोणाची,

हा प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाही. याच पार्श्वभूमीवर याचिकेत निवडणूक खर्चासाठी सुरक्षा ठेव आणि राजीनामा देणाऱ्या प्रतिनिधींच्या आर्थिक उत्तरदायित्वासह काही उपायांचा विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मात्र उपाय करताना संविधानिक अधिकार आणि मतदारांचा अधिकार यांचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. राजीनामा देण्याचा अधिकार काढून घेणे हा उपाय नाही; पण त्या अधिकाराचा वापर करून निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर होऊ नये, यासाठी स्पष्ट नियम असणे गरजेचे आहे. तातडीच्या राजीनाम्यानंतर त्याच मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवण्यावर काही वैधानिक अटी, पारदर्शक कारणांची माहिती, आर्थिक उत्तरदायित्व किंवा योग्य ‘कूलिंग-ऑफ’ कालावधी याबाबत संसद आणि निवडणूक आयोगाने गांभीर्याने विचार करायला हवा.

लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीत नाही, तर मतदाराच्या मताचा सन्मान राखण्यात आहे. पक्ष बदलणे हा राजकीय अधिकार असू शकतो; पण मतदाराचा कौल राजकीय सोयीचा कागद बनू नये. मद्रास उच्च न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न म्हणूनच एका राज्यापुरता न ठेवता संपूर्ण निवडणूक व्यवस्थेने गांभीर्याने घ्यायला हवा. निवडणूक जिंकणे सोपे असू शकते; पण जनतेचा विश्वास जपणे ही खरी लोकशाहीची कसोटी आहे.

## दुष्काळाच्या दारात शेतकरी, निर्णयाच्या प्रतीक्षेत कृषीमंत्री! सत्ता फडणवीसांचीच, मग जबाबदारी कोणाची?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात आहे. काही भागांत ३० दिवसांहून अधिक पावसाचा खंड पडला असून, शासनाने दुष्काळी स्थितीचे पंचनामे सुरू करण्याची तयारी केली आहे. अशा वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे दुष्काळ जाहीर करावा ही आजची गरज आहे; तो आपोआपच जाहीर होईल हे वक्तव्य शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी प्रश्न अधिक तीव्र करणारे आहे.

कृषिमंत्री म्हणजे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारकडून निर्णय पुढे नेणारा जबाबदार चेहरा. मग दुष्काळ जाहीर करण्यासाठीही तो आपोआप होईल अशी प्रतीक्षा का? शेतकऱ्याची पिके आपोआप करपतात, कर्ज आपोआप वाढते, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आपोआप निर्माण होतो; पण शासनाचा निर्णय मात्र आदेशाची प्रतीक्षा करत राहणार का?

याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कृषी खात्याचा निर्णयाधिकार प्रत्यक्षात कुठे आहे? दुष्काळ, पंचनामे, नुकसानभरपाई, चारा छावण्या आणि कर्जमाफीसारख्या विषयांवर अंतिम राजकीय दिशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार ठरवत असल्याचे उपलब्ध माहितीत दिसते. दुष्काळी परिस्थितीवरील पंचनाम्यांचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे वृत्त आहे.

याचा अर्थ कृषिमंत्री केवळ घोषणा करणारे माध्यम बनले आहेत का, असा प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांना आश्वासन नको; वेळेत निर्णय, स्पष्ट आदेश आणि प्रत्यक्ष मदत हवी आहे.

कर्जमाफी योजनेत ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे; मात्र लाभार्थी याद्या आणि प्रक्रियेबाबत प्रश्नही उपस्थित झाले आहेत.

संकटाच्या काळात मंत्र्यांनी जबाबदारी पुढे ढकलण्याऐवजी ती स्वीकारण्याची वेळ आहे. शेतकरी सरकारच्या दारात उभा आहे; कृषिमंत्री आदेशाच्या दारात उभे राहणार की निर्णय घेणार?

## विम्याशिवाय वाहनाला पेट्रोल नाही; पण नियम काही मोजक्या पंपांपुरता नको!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

रस्ते अपघातांमध्ये वाहनचालकासोबत निष्पाप नागरिकांनाही मोठी किंमत मोजावी लागते. अशा परिस्थितीत वैध थर्ड-पार्टी मोटार विमा नसलेल्या वाहनांना इंधन न देण्याच्या प्रस्तावित व्यवस्थेकडे केवळ निर्बंध म्हणून न पाहता रस्ते सुरक्षा आणि वाहनमालकांची कायदेशीर जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया (खठ्ठअख) काही निवडक शहरांत ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन (अछझठ) आधारित प्रणालीची चाचणी घेणार असल्याचे समोर आले आहे. वाहन क्रमांकाच्या आधारे विम्याची स्थिती तपासण्यासाठी इन्शुरन्स इन्फॉर्मेशन ब्युरो आणि वाहन पोर्टलमधील माहिती जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.


प्रशासनाची ही दिशा स्वागतार्ह आहे; मात्र प्रयोग काही शहरांपुरता मर्यादित राहिला तर त्याचा अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही. देशातील प्रत्येक पेट्रोल-डिझेल पंपाला भविष्यात या व्यवस्थेशी जोडण्याचे स्पष्ट आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीचे धोरण आवश्यक आहे. मात्र डिजिटल यंत्रणा उभी करताना तांत्रिक त्रुटी, विमा नूतनीकरणानंतर माहिती अद्ययावत होण्यास होणारा विलंब, चुकीची वाहनक्रमांक ओळख आणि डेटा गोपनीयता याकडे दुर्लक्ष करता कामा नये. अन्यथा वैध विमा असलेल्या वाहनमालकालाच इंधन नाकारले जाण्याचा अन्याय होऊ शकतो.

त्यामुळे ‘नो इन्शुरन्स, नो पेट्रोल-डिझेल’ हा नियम असेल तर तो निवडक पंपांसाठी नव्हे, तर समान निकषांवर देशभर लागू झाला पाहिजे. चाचणी यशस्वी झाल्यानंतर केंद्र आणि राज्यांनी स्पष्ट कालमर्यादा जाहीर करून सर्व इंधन पंपांना या प्रणालीत आणणे गरजेचे आहे. नियम सर्वांसाठी समान असेल, तरच त्याला खरी अंमलबजावणीची ताकद मिळेल.

# “आता बास झालं, नाहीतर आम्हाला सुद्धा...”; उद्धव ठाकरेंचे दिशा सालियन प्रकरणी रोखठोक भाष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाने सहा वर्षांनंतर पुन्हा एकदा राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. सीबीआयने याप्रकरणी नुकताच एफआयआर दाखल केला आहे. त्यामुळे यासंदर्भात आधीपासूनच सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांना आता अधिक धार चढली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या प्रकरणातील एफआयआरमध्ये आरोपी म्हणून आदित्य ठाकरे यांचे नाव नाही. दिशाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भाने घेतलेली नावे हा केवळ प्रक्रियात्मक तपशील आहे. या साऱ्या गोष्टींवर उद्धव ठाकरे यांनी आज रोखठोक भाष्य केले.



‘‘या प्रकरणात आता माझं नाव आलं आहे, उद्या तुमचंही नाव येऊ शकतं आणि हे मी खूप गंभीर्याने बोलत आहे. ज्या प्रकरणाशी आमचा दूरवर काहीही संबंध नाही, ज्यांची आणि आमची ओळखपाळखही नाही अशा ठिकाणी आमचे नाव गोवण्यात आले आहे. हा प्रकार राजकीय हेतूने प्रेरित आहे. आम्ही आत्तापर्यंत गप्प होतो. तुम्हाला ज्यांची चौकशी करायची असेल, त्यांची चौकशी करा; पण फालतू चारित्र्यहनन करू नका. आता हे बास झालं, नाहीतर आम्हालाही कायदेशीर पावलं उचलावी लागतील,’’ असा स्पष्ट इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

आदित्य ठाकरे यांनीही याबाबत एक्स पोस्ट केली आहे. ‘‘अफवांचा धुरळा उडवणं बंद करण्यासाठी पुन्हा एकदा फक्त आणि फक्त तथ्य सांगतो! मी दिशा सालियन ह्यांना कधीही भेटलेलो नाही किंवा त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती.’’

’’ राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझं नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरु आहे. कुठलंही तथ्य आणि सत्य नसलेलं हे सततचं खोटं कँपेन दुर्दैवी आहे. बोंबाबोंब करुन केल्या जाणाऱ्या टिव्ही चॅनल्सवरच्या खोट्या चर्चा आणि मिडिया ट्रायल्स सत्य बदलू शकत नाहीत. अधिकृत यंत्रणांना कुठल्याही व्यत्ययाशिवाय, राजकीय हस्तक्षेपाशिवाय, चारित्र्यहननाशिवाय आणि निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा नव्याने ही चौकशी करु द्या. परत एकदा सांगतो, ज्यांना वाटत असेल की अश्या चारित्र्यहननाच्या आणि खोट्या प्रचाराच्या मार्गाने तुम्ही आम्हाला शांत बसवू शकाल तर तो तुमचा भ्रम आहे. सत्यासाठी, अन्यायाविरुद्ध, देशवासीयांना सोबत घेऊन आमचा लढा सुरुच राहील,‘‘ असे आदित्य ठाकरे यांनी ठणकावून सांगितले.

# राजकारण्यांनंतर आता नोकरशाहीचीही कसोटी; भ्रष्टाचाराच्या फाइलांना ‘प्रशासकीय विलंब’चे कवच कशाला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

निविदा गैरव्यवहाराच्या प्रकरणात दोन आयएएस अधिकाऱ्यांवर खटला चालवण्यासाठी आवश्यक मंजुरीची प्रक्रिया दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश मद्रास उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. नोव्हेंबर २०२५पासून या मंजुरीसंदर्भात कोणती पावले उचलली, याचा सविस्तर अहवालही न्यायालयाने मागवला आहे. संबंधित फाइल्स केंद्रीय दक्षता आयोगाकडे पाठवण्यात आल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.

या आदेशाचा व्यापक अर्थ केवळ दोन अधिकाऱ्यांच्या प्रकरणापुरता मर्यादित नाही. भ्रष्टाचाराचा संशय निर्माण झाल्यानंतर चौकशी आणि खटल्यासाठीची मंजुरी वर्षानुवर्षे सरकारी टेबलांवर फिरत राहणार असेल, तर भ्रष्टाचारविरोधी कायद्यांची धार कुठे उरते?

लोकशाहीत मंत्री बदलतात, सरकारे बदलतात; पण प्रशासनाची यंत्रणा कायम असते. त्यामुळे सार्वजनिक पैशांच्या वापराशी संबंधित निर्णय घेणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उत्तरदायित्वाची चौकटही तितकीच स्पष्ट आणि कठोर असणे आवश्यक आहे. मात्र कठोरता म्हणजे दोष सिद्ध होण्यापूर्वी शिक्षा नव्हे. निष्पक्ष चौकशी, नैसर्गिक न्याय आणि दोष सिद्ध झाल्यास निश्चित कारवाईही तीनही तत्त्वे एकाच वेळी जपली पाहिजेत.

आज प्रश्न असा आहे की, एखाद्या अधिकाऱ्यावर गंभीर गैरव्यवहाराचे आरोप असतील आणि तपास यंत्रणेला पुढील कायदेशीर कारवाईसाठी मंजुरीची आवश्यकता असेल, तर त्या मंजुरीला अनिश्चित काळ का लागावा? फाइल एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात, एका समितीकडून दुसऱ्या संस्थेकडे जात राहणे ही प्रशासकीय प्रक्रिया असू शकते; पण हीच प्रक्रिया न्यायाला विलंब देणारे साधन बनली तर तिच्यावर नियंत्रण कोणाचे?

यासाठी भ्रष्टाचारविरोधी कायद्यांत केवळ शिक्षा वाढवण्यापेक्षा उत्तरदायित्वाची स्पष्ट वेळमर्यादा आवश्यक आहे. खटला चालवण्याची मंजुरी मागितल्यापासून निर्णयासाठी निश्चित कालावधी, फाइलच्या प्रत्येक टप्प्याची डिजिटल नोंद, विलंबाचे कारण लेखी स्वरूपात नोंदवणे आणि अनावश्यक विलंबासाठी संबंधित अधिकाऱ्यांची प्रशासकीय जबाबदारी निश्चित करणे, अशा उपायांचा विचार होऊ शकतो.

विशेषतः मोठ्या सरकारी निविदा, पायाभूत सुविधा, कंत्राटे आणि सार्वजनिक निधीशी संबंधित प्रकरणांत निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याची गरज आहे. ‘अधिकारी आहे म्हणून संरक्षण’ आणि ‘राजकीय व्यक्ती आहे म्हणून कारवाई’ अशी दुहेरी व्यवस्था लोकशाहीला परवडणारी नाही. कायदा पद पाहून बदलता कामा नये. मद्रास उच्च न्यायालयाने दोन महिन्यांची वेळमर्यादा निश्चित करून प्रशासनाला प्रक्रियेला गती देण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. आता केंद्र आणि राज्यांनी या प्रश्नाकडे व्यापक कायदेविषयक सुधारणेच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

कारण भ्रष्टाचाराविरोधातील लढाई फक्त राजकारण्यांपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही. सत्ता राजकीय असो किंवा प्रशासकीयसार्वजनिक पद म्हणजे अधिकाराबरोबर सार्वजनिक उत्तरदायित्वही.

फाइल दडवून ठेवणे, मंजुरी लांबवणे किंवा प्रक्रिया अनिश्चित काळ चालू ठेवणे यामुळे आरोप खरे ठरत नाहीत; पण न्यायप्रक्रियेला विलंब नक्कीच होतो. म्हणूनच गरज आहे ती कठोर पण न्याय्य, वेगवान पण पारदर्शक भ्रष्टाचारविरोधी व्यवस्थेची.

जनतेच्या पैशांवर निर्णय घेणाऱ्या प्रत्येक हाताला कायद्याची जाणीव असली पाहिजेआणि त्या कायद्यापासून कोणत्याही पदाला कायमस्वरूपी संरक्षण मिळता कामा नये.

## संपादकीय

### डिजिटल क्रांती की आर्थिक कोंडी? धोरणांच्या घाईचा सामान्य माणसावर भार

डिजिटल भारताच्या विस्तारामुळे व्यवहारांची गती वाढली आणि युपीआयने आर्थिक व्यवहारांचे स्वरूप बदलले. आज चहाच्या टपरीपासून मोठ्या दुकानापर्यंत क्युआर कोड सहज दिसतो. मोबाईलच्या एका क्लिकवर पैसे पाठवता येतात. ही सुविधा नाकारण्याचा प्रश्न नाही; प्रश्न आहे तो या डिजिटल विस्ताराचे नियोजन किती सर्वंकषपणे झाले आणि त्याचा सामान्य नागरिक, विशेषतः मध्यमवर्ग, यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा किती विचार झाला, याचा. तंत्रज्ञान म्हणजे विकास आणि डिजिटल व्यवहार म्हणजे आर्थिक शिस्त, असे सरळ समीकरण मांडता येत नाही. व्यवहार सुलभ झाल्याने किरकोळ खर्चाची वारंवारता वाढू शकते आणि रोख रक्कम खर्च करताना जाणवणारी आर्थिक जाणीव डिजिटल व्यवहारात कमी होऊ शकते. त्यामुळे डिजिटल साक्षरतेबरोबरच आर्थिक शिस्त आणि खर्चाचे नियोजनही महत्त्वाचे ठरते.

या चर्चेतील सर्वांत दुर्लक्षित घटक म्हणजे मध्यमवर्ग. पगार, गृहकर्ज किंवा भाडे, मुलांचे शिक्षण, आरोग्यखर्च, विमा, वाहतूक, महागाई आणि भविष्यासाठीची बचत यांचा ताळमेळ साधणाऱ्या कुटुंबासाठी प्रत्येक रुपया महत्त्वाचा असतो. त्यामुळे डिजिटल धोरणांचे मूल्यमापन केवळ व्यवहारांची संख्या आणि मूल्य वाढले यावर न करता, मध्यमवर्गाच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीवर त्याचा काय परिणाम झाला, यावरही व्हायला हवे.

नोटाबंदीच्या काळात डिजिटल व्यवहारांना चालना मिळाली आणि त्यानंतर युपीआयने त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. मात्र अशा व्यापक आर्थिक बदलासाठी केवळ तंत्रज्ञानाची उपलब्धता पुरेशी नसते. पायाभूत सुविधा, ग्रामीण-शहरी डिजिटल दरी, नेटवर्कची क्षमता, सायबर सुरक्षा, ग्राहक संरक्षण, तक्रार निवारण आणि आर्थिक साक्षरता यांचे आधीच सर्वंकष नियोजन आवश्यक असते.

याच ठिकाणी धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होतात. प्रशासनातील अनुभवी अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष अनुभव, अर्थतज्ज्ञांचे विश्लेषण, तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत, ग्राहकांच्या अडचणी तसेच मंत्रिमंडळातील विविध विभागांचा अनुभव या सर्वांचा व्यापक धोरणांमध्ये किती समावेश झाला, हे महत्त्वाचे आहे. घाईने व्यवस्था उभारण्यापेक्षा तिच्या संभाव्य परिणामांचे पूर्वमूल्यमापन आणि नंतरचे पारदर्शक पुनरावलोकन अधिक आवश्यक आहे.

डिजिटल व्यवस्थेतील तांत्रिक अडचणीही दुर्लक्षित करता येणार नाहीत. नेटवर्क खंडित होणे, व्यवहार अडकणे, चुकीच्या खात्यात पैसे जाणे किंवा सायबर फसवणूक झाल्यास नागरिकाला त्वरित आणि स्पष्ट तक्रार निवारण व्यवस्था मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात डिजिटल सुविधा मर्यादित असतील तर पर्यायी व्यवस्था उपलब्ध असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

डिजिटल व्यवस्था सुविधा असावी; नागरिकाची सक्ती किंवा मजबुरी नव्हे.

युपीआय च्या वापरासोबत नागरिकांनीही दक्षता घेणे आवश्यक आहे. किरकोळ खर्चासाठी मर्यादित रकमेचे स्वतंत्र खाते वापरणे, युपीआय लाईट सारख्या उपलब्ध सुविधांचा योग्य वापर करणे, व्यवहारांचे संदेश तपासणे, अनोळखी लिंक किंवा ठथ कोडपासून सावध राहणे आणि आवश्यकतेनुसार काही रोख रक्कम जवळ ठेवणे उपयोगी ठरू शकते.

परंतु डिजिटल व्यवस्थेतील प्रत्येक जोखीम नागरिकांनीच पेलायची आणि सरकारने केवळ डिजिटल व्यवहारांच्या वाढीची आकडेवारी मांडायची, हे पुरेसे नाही. डिजिटल अर्थव्यवस्थेचे यश व्यवहारांच्या संख्येबरोबरच नागरिकांच्या आर्थिक सुरक्षिततेत, मध्यमवर्गाच्या आर्थिक स्थैर्यात आणि ग्रामीण भागातील प्रत्यक्ष उपलब्धतेत मोजले गेले पाहिजे.

डिजिटल भारत मागे नेण्याची गरज नाही; तो अधिक नियोजनबद्ध, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि नागरिककेंद्री करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रशासनाचा अनुभव, तज्ज्ञांचे विश्लेषण, बँकिंग क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती, मंत्रिमंडळातील सामूहिक चर्चा आणि सामान्य नागरिकाचे वास्तव यांना धोरणनिर्मितीत योग्य स्थान मिळणे आवश्यक आहे.

कारण केवळ तंत्रज्ञान आणणे म्हणजे धोरण नव्हे; त्या तंत्रज्ञानाचा समाजातील प्रत्येक घटकावर होणारा परिणाम समजून घेणे म्हणजे खरे धोरणनिर्माण.

डिजिटल क्रांतीची खरी कसोटी क्युआर कोडच्या संख्येत नाही, तर त्या क्युआर कोडच्या पलीकडे उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाच्या आर्थिक सुरक्षिततेत आहे. आणि त्यासाठी घाईपेक्षा नियोजन, घोषणेपेक्षा प्रत्यक्ष तयारी आणि एककल्ली निर्णयापेक्षा सामूहिक विचार अधिक आवश्यक आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा होणार

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव; सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन

■ पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि अधिकारी-कर्मचारी केंद्रित उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यंदा ११ ऑक्टोबर रोजी रविवार असल्याने मुख्य वर्धापन दिन कार्यक्रम सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी तसेच प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनाची पूर्वतयारी सुरू असून, यासंदर्भात बैठक घेण्यात आली.

वर्धापन दिनानिमित्त नगरीचे शिल्पकार अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यासोबत रक्तदान शिबिर, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी पाककला व रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, रस्सीखेच यांसह विविध क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कर्मचारी ऑर्केस्ट्रा, चहापान व अल्पोपहार तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही नियोजन करण्यात आले आहे.



महानगरपालिकेच्या विविध विभागांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विविध स्पर्धांतील विजेत्यांनाही पारितोषिके देण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या स्थापनेपासूनच्या ४४ वर्षांच्या विकासप्रवासाचा आढावा घेण्यासोबतच वर्षभरात राबविण्यात आलेली विकासकामे, प्रकल्प, योजना आणि नागरिकाभिमुख उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. सोशल मीडिया तसेच शहरातील व्हीएमडीच्या माध्यमातून विकासकामांची माहिती आणि वर्धापन दिनाचे संदेश प्रसारित करण्याचे नियोजन आहे.

कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध विभागांना जबाबदाऱ्या सोपविण्यात येणार असून, स्वच्छता, सुरक्षा, अग्निशमन, वैद्यकीय सुविधा, विद्युत व्यवस्था, पुष्पसजावट, मंडप व मंच व्यवस्था आदींची आवश्यक तयारी करण्यात येणार आहे.

४४ वा वर्धापन दिन हा शहराच्या विकासप्रवासाचा आढावा घेण्याबरोबरच या वाटचालीत योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या कार्याची दखल घेण्याचा प्रसंग आहे. आगामी काळात शहराच्या वाढत्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन अधिक सक्षम, गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख प्रशासन देण्यास प्राधान्य राहील, असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

बैठकीस सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, प्रभाग अध्यक्ष निखील बो-हाडे, नगरसदस्य राजू मिसाळ, विकास साने, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व संबंधित उपस्थित होते.

# उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांच्या हस्ते उद्घाटन; १३३ शाळांचा सहभाग

## शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धांना उत्साहात सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धांना गुरुवारी निगडी प्राधिकरणातील मदनलाल धिंग्रा मैदानावर उत्साहात सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्यासोबतच संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्ती विकसित व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील १३३ शाळांनी सहभाग नोंदविला आहे.

उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी दीपक कन्हेरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा पर्यवेक्षक ऐश्वर्या साठे यांनी केले.



या स्पर्धेमुळे शालेय विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले असून, विविध शाळांतील खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळाल्यास त्यांच्या सुप्त गुणांना योग्य व्यासपीठ मिळते. या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी खिलाडूवृत्तीने खेळत आपले सर्वोत्तम कौशल्य दाखवावे आणि भविष्यात शहराचे नाव राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करावे, असे उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांनी सांगितले.

## प्रमाणित बियाणे वितरण घटकांचा लाभ घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

■ पुणे : प्रतिनिधी

पुणे विभागाच्यावतीने रब्बी हंगामातील कडधान्य आत्मनिर्भरता अभियान योजनेअंतर्गत सन २०२६-२७ हरभरा, मसूर पिकाकरिता प्रमाणित बियाणे वितरण घटकाचा लाभ देण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी केले आहे.

शासनाकडून हरभरा पिकाचे ५ वर्षापेक्षा कमी कालावधीचे वाण (अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्ष) किंमतीच्या ७५ टक्के किंवा ६ हजार रुपये प्रति क्विंटल (यापैकी जे कमी असेल ते) व ५ वर्षापेक्षा जास्त परंतू १० वर्षापेक्षा कमी कालावधीचे वाण किंमतीच्या ५० टक्के किंवा ४ हजार रुपये प्रति क्विंटल (यापैकी जे कमी असेल ते) तसेच मसूर पिकात ५ वर्षापेक्षा कमी कालावधीचे वाण (अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्ष) किंमतीच्या १०० टक्के किंवा १२ हजार रुपये प्रति क्विंटल (यापैकी जे कमी असेल ते) अनुदानावर लाभ दिला जात आहे. प्रति शेतकरी कमाल १ हेक्टर पर्यंत मर्यादित आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखत्र (फार्मर आयडी) असणे बंधनकारक असून **https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin** या संकेतस्थळावर अर्ज सादर करावे. यापूर्वी लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना पुढील दोन वर्षे लाभ दिला जाणार नाही. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

# प्रबोधनकार ठाकरे यांना महापौर रवि लांडगे यांचे अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

थोर समाजसुधारक, विचारवंत, लेखक आणि पत्रकार केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शिक्षण समिती सभापती रविना अंघोळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, उपआयुक्त अण्णा बोदडे, लेखाधिकारी दीपक गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते मधुकर बच्चे यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रबोधनकार ठाकरे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातीय विषमता आणि सामाजिक अन्यायाविरोधात परखड भूमिका मांडली. विवेक, समता, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या निर्भीड विचारसरणी आणि प्रभावी लेखनातून महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.

## घरोघरी माहेरवाशिणी गौरायांचे उत्साहात आगमन...!

## सोन्या-रुप्याच्या पावलांनी गौरी आल्या घरी !

■ पुणे : प्रतिनिधी

भाद्रपद शुक्ल पक्षातील ज्येष्ठागौरी उत्सवाला गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी पुण्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत उत्साहात सुरुवात झाली. महिलांनी आपल्या घरच्या परंपरेनुसार गौरींचे थाटात आवाहन करून त्यांचे स्वागत केले. पुणे पंचांगानुसार शुक्ल षष्ठी सकाळी १०.४८ वाजेपर्यंत होती आणि त्यानंतर सप्तमी तिथी सुरू झाली. अनुराधा नक्षत्र रात्री सुमारे ७.५३ वाजेपर्यंत होते, त्यानंतर ज्येष्ठा नक्षत्र सुरू झाले.

गौरी आवाहनाच्या पहिल्या दिवशी अंगणातील तुळशीपासून घरात गौरायांचे आगमन केले जाते. प्रवेशद्वारापासून गौरींच्या स्थापनेच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे उमटवले जातात. गौरी घेऊन येणाऱ्या सुवासिनीचे पाय दूध आणि पाण्याने धुऊन त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढले जाते. त्यानंतर औक्षण करून, ताट-चमचा किंवा घंटा वाजवत गौरायांचे मंगलमय स्वागत केले जाते.

गौरींचे आगमन होत असताना घरातील धान्य, धनसंपत्ती, दूध-दुभते आणि समृद्धीच्या वस्तू त्यांना दाखवण्याची प्रथा आहे. घरात सुख, शांती, समृद्धी, धन-धान्य, ऐश्वर्य आणि आरोग्य नांदो, अशी प्रार्थना यावेळी केली जाते.

घरांमध्ये माहेरवाशिणीला गौरी आवाहनाचा मान दिला जातो.गौरी आल्या घरी, सोन्या-रुप्याच्या पावलांनी या पारंपरिक भावनेने महिलांनी गौरायांचे स्वागत केले. आवाहनानंतर गौरींची पूजा, आरती करून फुलोरा, फराळ तसेच घरच्या परंपरेनुसार विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवण्यात आला.

भाद्रपद शुक्ल पक्षातील या उत्सवात गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठा नक्षत्रावर केले जात असल्याने त्यांना 'ज्येष्ठागौरी' असेही संबोधले जाते. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवातील पहिला दिवस गौरी आवाहनाचा, दुसरा दिवस गौरी पूजनाचा आणि तिसरा दिवस विसर्जनाचा असतो.यंदा शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी ज्येष्ठागौरी पूजन होणार आहे. ज्येष्ठा नक्षत्राच्या दिवशी गौरींची मुख्य पूजा केली जाते. घरच्या परंपरेनुसार दुपारपूर्वी किंवा ठरलेल्या पूजाविधीनुसार गौरींना नैवेद्य दाखवण्यात येणार आहे.शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी गौरी विसर्जनाचा सोहळा होणार असून, तीन दिवसांच्या या उत्सवानंतर गौरायांना भावपूर्ण निरोप देण्यात येईल.

# बावधन-म्हाळुंगे परिसरात पूर्ववैमनस्यातून तरुणावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बावधन : प्रतिनिधी

घटना: मुळशी तालुक्यातील म्हाळुंगे गावातील अक्षय ऑटो गॅरेजजवळ सुजल ढमाळ हा तरुण आपल्या मित्रासह थांबला असताना पूर्ववैमनस्यातून ७ जणांच्या टोळक्याने अचानक हल्ला चढवला. आरोपींनी धारदार शस्त्रांनी वार करून दोघांना गंभीर जखमी केले.

आरोपी: अभिषेक कांबळे, उदय वायकर, ज्ञानेश्वर घुले, अर्जुन भाबट, करण पवार, गणेश भागवत आणि अभिषेक पुरी (सर्व रा. सुस, हिंगवडी व म्हाळुंगे परिसर).

कारवाई: बावधन पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमांन्वये (११८(१), ११८(२), ३५२, ३५१(२), १८९, १९०, १९१(२)) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक खोत पुढील तपास करत आहेत.

**चाकणमध्ये जुन्या वादातून एकाच कुटुंबातील चौघांना बेदम मारहाण**

घटना: खराबवाडी/भासे (ता. खेड) येथील साई पार्क पठारे वस्ती येथे जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका कुटुंबावर लाकडी दांडके, वीट आणि लाथाबुक्क्यांनी जीवघेणा हल्ला करण्यात आला. यामध्ये कुरियर डिलिव्हरी बॉय सचिन बालटकर, त्यांची आई, वडील आणि मावशी गंभीर जखमी झाले आहेत.

आरोपी: रुपाली कुसाळकर, महेश कुसाळकर व महादेव कुसाळकर (सर्व रा. भासे, ता. खेड).

कारवाई: उत्तर चाकण पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल झाला असून पोलीस हवालदार डगळे तपास करत आहेत.

**गणपती वर्गणी देण्यास नकार दिल्याने महिलेला बांबूने मारहाण**

घटना: बोपोखेल येथील रामनगर भागात गिरणीत काम करणाऱ्या आशा यादव (वय ४२) यांच्याकडे एका तरुणाने येऊन गणपती वर्गणीची मागणी केली. फिर्यादीने वर्गणी देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या आरोपीने वाद घालत शिवीगाळ व धमकी दिली. त्यानंतर हातातील लाकडी बांबूने मारहाण करत महिलेच्या डाव्या कानाला दुखापत केली.

आरोपी: बादल वाल्मिकी (वय १८, रा. बोपोखेल) – आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

कारवाई: दापोडी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल.

**निघोजे एमआयडीसीत कंपनी फोडली; सव्वा पाच लाखांचे पार्ट लंपास**

घटना: म्हाळुंगे एमआयडीसी हद्दीतील निघोजे येथील 'रोटा फ्रीड्रीया प्रा.लि.' ही कंपनी बंद असल्याचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. चोरट्याने कंपनीतून तब्बल ५ लाख २१ हजार ३५७ रुपये किमतीचे 'लॉकिंग असेंबली'चे पार्ट चोरून नेले.

तक्रारदार: राहुल शहानाप्पा मण्णे (वय २४)

कारवाई: महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०५ (अ) अन्वये अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक घुले तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### नायडू जलशुद्धीकरण केंद्राला वीज पुरवठ्यासाठी ५६ कोटींच्या कामाला मंजुरी : श्रीनाथ भिमाले

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

जायका प्रकल्पांतर्गत उभारण्यात येत असलेल्या १२७ एमएलडी क्षमतेच्या नायडू मैलापाणी शुद्धीकरण केंद्राला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून (महावितरण) वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी ५६ कोटी १७ लाख रुपयांच्या कामाला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले. नायडू मैलापाणी शुद्धीकरण केंद्राला वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने उच्चदाब (एचटी) केबल, रिंग मेन युनिट (आरएमयू), मीटरिंग किऑस्क, केबल खोदाई, अर्थिंग, अर्थिंग स्ट्रिप आणि केबल जॉईंट आदी कामांचा समावेश असलेले पूर्वगणनपत्रक तयार केले होते. या कामासाठी ६ कोटी २४ लाख १४ हजार ८११ रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. महापालिकेच्या जायका प्रकल्पांतर्गत ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी नायडू केंद्राला वीजपुरवठा उपलब्ध झाल्यानंतर केंद्राच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक विद्युत सुविधा निर्माण होणार आहेत. या कामामुळे मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. निविदा अटी व मान्य तांत्रिक तपशीलानुसार काम करून घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहणार आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंचर पोलिसांची पोलीस पाटलांसोबत बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व पोलीस पाटलांची बैठक मंगळवारी मंचर पोलीस ठाण्यात घेण्यात आली. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

गणेश मंडळांकडून नियमांचे पालन करून घेणे, ध्वनी प्रदूषणास प्रतिबंध करणे आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना पोलीस पाटलांना देण्यात आल्या. मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सातत्याने समन्वय ठेवण्यावरही यावेळी भर देण्यात आला.

दरम्यान, ग्रामीण भागातील वाढत्या चोरी, घरफोडी तसेच शेतीमालाच्या चोरीला आळा घालण्यासाठी ग्रामसुरक्षा दल पुन्हा सक्रिय करण्याचे निर्देश देण्यात आले. 'आपले गाव, आपली निगराणी' या उपक्रमांतर्गत लोकसहभागातून गावातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.



सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, दुकानदार, व्यापारी, पेट्रोलपंपधारक तसेच विविध व्यावसायिकांनी पुढाकार घेऊन अधिकाधिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत, असे आवाहन करण्यात आले. गावापासून दूर असलेल्या घरांबरोबरच वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांच्या सुरक्षेसाठी गस्त वाढविणे, सीसीटीव्ही बसविणे आणि अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबतही चर्चा झाली.

गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी समन्वय ठेवून कोणतीही अनुचित घटना, वाद-विवाद अथवा संशयास्पद हालचाल निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ मंचर पोलीस ठाण्यास देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित वातावरणात आणि शासनाच्या नियमांचे पालन करून साजरा करावा, असे आवाहन मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी प्रश्न गुरुजनांना विचारा; चॅटजीपीटीचा नैतिक वापर करा

## प्रश्न विचारण्याच्या सवयीनेच स्वतःसह समाजाची प्रगती : डॉ. रतिलाल बाबेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी थेट चॅटजीपीटीचा आधार न घेता गुरुजनांना प्रश्न विचारण्याची सवय लावून घ्यावी. 'का?' आणि 'कसे?' या प्रश्नांतूनच जिज्ञासा निर्माण होते आणि अनेक समस्यांची उकल होते. चॅटजीपीटीचा वापर करताना त्याचा नैतिक आणि योग्य पद्धतीने वापर करावा, असे प्रतिपादन डॉ. रतिलाल बाबेल यांनी केले.

श्री गणेश फेस्टिवल २०२६ निमित्त श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती ट्रस्ट, श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग यांच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत 'गणपती व वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर डॉ. बाबेल बोलत होते. यावेळी सरपंच वैभव पोखरकर, शाळा समितीचे अध्यक्ष दत्तात्रय वायकर, उद्योजक अशोक गोरडे, मुख्याध्यापक हेमंत विटकर, गोरक्ष फुलसुंदर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



डॉ. बाबेल म्हणाले, अपयशाला घाबरू नका. नकार पचविण्याची सवय अंगी बाळगा. यशासाठी कष्टाला पर्याय नाही आणि शॉर्टकटने यश मिळत नाही. विद्यार्थ्यांनी सभोवतालच्या वनस्पतींचे निरीक्षण करून त्यांचे औषधी गुणधर्म जाणून घ्यावेत. उत्सव निसर्गपूरक पद्धतीने साजरे करताना तुळस, बेल, दुर्वा यांचे धार्मिक महत्त्व तसेच त्यामागील वैज्ञानिक कारणे समजून घ्यावीत, असे त्यांनी सांगितले.

दिवसाची सुरुवात कृतज्ञतेने करावी आणि मदत करणाऱ्या व्यक्तींप्रती कृतज्ञता व्यक्त करावी. ज्ञानलालसा आणि कृतज्ञता जपण्याबरोबरच घरातील कामांमध्ये मदत करण्यास मुलांनी कमीपणा मानू नये आणि स्त्रीशक्तीचा आदर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

परिस्थिती कशीही असली तरी मनस्थिती बदला. प्रत्येक गोष्टीकडे डोळसपणे पाहा. गणपतीची प्रतिष्ठापना दीड, पाच किंवा सात दिवसच का केली जाते, यामागील वैज्ञानिक कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करा. विज्ञान समजणे अवघड नाही; स्वतःला प्रश्न विचारण्याची सवय लावून घ्या, असे डॉ. बाबेल यांनी सांगितले.

व्याख्यानादरम्यान विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबेल यांच्या वतीने वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणारी पुस्तके भेट देण्यात आली. तसेच शाळेला 'सुवचने तुकोबाची' आणि 'वैज्ञानिक दृष्टिकोन' ही पुस्तके देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुरेंद्र डोके यांनी केले. दत्तात्रय वायकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन हेमंत विटकर, बाळासाहेब सैद, रविकिरण डोंगरे आणि बाळासाहेब लोखंडे यांनी केले.

# शालेय कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; २५ शाळांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । वृत्तसंस्था

जिल्हा क्रीडा परिषद पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने आंबेगाव तालुका क्रीडा संकुल, मंचर येथे आयोजित शालेय कुस्ती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आंबेगाव तालुक्यातील तब्बल २५ शाळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.




स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या विविध वजनगटांतील कुस्तीच्या लढती घेण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच गुणवंत खेळाडूंना पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी संधी मिळावी, हा स्पर्धेचा उद्देश आहे.

कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक क्रीडा प्रकार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये या खेळाची विशेष आवड आहे. शालेय स्तरावरील अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक अनुभव मिळण्याबरोबरच त्यांच्यातील क्रीडा गुणवत्तेला योग्य दिशा मिळण्यास मदत होते.

खेळामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्यासोबतच आत्मविश्वास, शिस्त, संयम आणि खिलाडूवृत्ती विकसित होते. त्यामुळे अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन तालुका क्रीडा अधिकारी शोभा पालवे यांनी केले.

स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे गुणवंत खेळाडूंना पुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार असल्याने स्पर्धकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# उंड्री चौक 'अपघात हॉटस्पॉट'; खड्डे, कोंडी अन् अवजड वाहनांचा जीवघेणा विळखा वाहतूक कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

झपाट्याने वाढणारे नागरीकरण, वाढती वाहनसंख्या आणि त्या तुलनेत अपुऱ्या वाहतूक सुविधांमुळे उंड्री चौक अपघातप्रवण ठरत आहे. अवजड वाहनांची दिवसभर होणारी वर्दळ, गर्दीच्या वेळेतील कोंडी, रस्त्यांवरील खड्डे आणि अपुरे वाहतूक नियमन यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

सोमवारी (१४ सप्टेंबर) सायंकाळी जमजम हॉटेलसमोर ट्रकच्या धडकेत ३४ वर्षीय दुचाकीस्वार विनोद सोनार (रा. हांडेवाडी) यांचा मृत्यू झाला. दुचाकीला धडक दिल्यानंतर ते ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने हा अपघात झाला. काही दिवसांपूर्वी भरधाव डंपरच्या धडकेत ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला होता. सलग घडलेल्या या घटनांमुळे उंड्री चौकातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

उंड्री, हांडेवाडी, पिसोळी तसेच खडी मशीन चौकाकडून ये-जा करणाऱ्या मार्गांवर डंपर, ट्रक, सिमेंट मिक्सर आणि पाण्याच्या टँकरची मोठी वर्दळ असते. गर्दीच्या वेळेत मोठी वाहने आणि दुचाकी-चारचाकींची संख्या वाढल्याने कोंडी होते. अवजड वाहनांच्या बाजूने मार्ग काढताना दुचाकीस्वारांना धोका निर्माण होतो. उंड्री परिसरातील शाळांमुळे सकाळी आणि दुपारी वाहतूक वाढते. स्कूल बस, पालकांची वाहने आणि रस्त्याच्या कडेला होणारे पार्किंग यामुळे कोंडीत भर पडते. त्यातच रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अचानक दिशा बदलावी लागते. पावसाळ्यात खड्ड्यांत पाणी साचल्याने धोका आणखी वाढतो.

८० कोटींच्या आराखड्याचे काय?

उंड्री-कडनगर परिसरातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी रस्ते रुंदीकरण आणि पायाभूत सुविधांसाठी सुमारे ८० कोटी रुपयांचा आराखडा प्रस्तावित असल्याचे सांगितले जाते. मात्र, त्याची अंमलबजावणी कधी होणार, हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. उंड्री चौकातील अपघात रोखण्यासाठी अवजड वाहनांचे नियमन, गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची नियुक्ती, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती आणि प्रस्तावित विकासकामांना गती देण्याची मागणी होत आहे. आणखी एखादा जीव गेल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी प्रशासनाने आताच ठोस पावले उचलावीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

"उंड्री चौक परिसराचा अलीकडेच काळेपडळ वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रात समावेश झाला आहे. या चौकातील अपघातप्रवण ठिकाणांचा अपघातांच्या कारणांचा सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगरपालिका यांच्या समन्वयाने संयुक्त आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. चौकात अवजड वाहतूक नियंत्रण, वाहतूक नियमन तसेच नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत काळेपडळ वाहतूक विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. - देवेंद्र पवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक, काळेपडळ वाहतूक विभाग, पुणे शहर

उंड्री परिसरातील वाढत्या वाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. याबाबत पीएमआरडीए आणि राज्य शासनाकडे ७८ मीटरचा मंजूर रस्ता तातडीने विकसित करण्याची मागणी केली आहे. तसेच कात्रज-खडी मशीन ते ब्रिक कॉलेजमार्गे उरुळीच्या दिशेने जाणारा डीपी रोड पर्यायी मार्ग म्हणून विकसित करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. - श्वेता घुले, स्थानिक नगरसेविका, पुणे महानगरपालिका

उंड्री चौकातील अरुंद व अवघड रस्ते, अवजड वाहनांची वाढलेली वर्दळ आणि सातत्याने होणारे अपघात यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुणे महापालिका प्रशासन, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून या समस्येवर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. येत्या पंधरा दिवसांत प्रश्न मार्गी लागला नाही, तर पुणे महापालिका आयुक्तांच्या दारात शिवसैनिकांच्या तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल. - प्रमोद नाना भानगिरे, शिवसेना पुणे शहरप्रमुख


उंड्री चौकात अवजड वाहनांची वाढलेली वर्दळ, रस्त्यावरील मोठ्या प्रमाणातील अतिक्रमणे आणि रस्त्याच्या मध्यभागी असलेले महावितरणचे विद्युत खांब यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे.

# 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'तर्फे मोफत आरोग्य शिबिर ! ११ हजार चष्म्यांचे मोफत वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
सासवड : प्रतिनिधी

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'च्या वतीने गणेशोत्सवानिमित्त नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांत नेत्र तपासणी, फिजिओथेरपी तसेच दंत उपचारांशी संबंधित तपासण्या करण्यात येणार असून गरजू नागरिकांना ११ हजार चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

या उपक्रमात विविध नामांकित रुग्णालये आणि संस्थांचा सहभाग आहे. अपोलो हॉस्पिटलच्या वतीने १६ ते १८ सप्टेंबरदरम्यान आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तसेच अग्रवाल आय हॉस्पिटलतर्फे १७ ते २० सप्टेंबरदरम्यान नेत्र तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे. संचेती हॉस्पिटलच्या वतीने २१ सप्टेंबरला फिजिओथेरपी तपासणी करण्यात येणार आहे. त्याच दिवशी तसेच २२ सप्टेंबरला इंडियन प्रोस्थोडॉन्टिक सोसायटी आणि डॉ. विजय माब्रुकर यांच्या सहकार्याने दंत तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. मॉडर्न कॉलेजच्यावतीने २२ सप्टेंबरला तर ढोले पाटील यांच्या सहकार्याने २३ सप्टेंबरला फिजिओथेरपी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'च्या मंडपात होणार असून अधिकाधिक गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे उत्सवप्रमुख व विश्वस्त पुनीत बालन यांनी केले आहे.



गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक उपक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध तपासण्यांमुळे नागरिकांना त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेता येणार असून, आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शनही मिळणार आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजोपयोगी उपक्रमांचा उत्सव व्हावा, हा आमचा सातत्याने प्रयत्न असतो. याच उद्देशाने यंदा विविध नामांकित रुग्णालये व संस्थांच्या सहकार्याने आरोग्य शिबिरांचे आयोजन केले आहे. नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आवश्यक उपचाराबाबत सल्ला मिळणार आहे.

# प्रेमविवाहामुळे नाराज कुटुंबाकडून मुलीचे अपहरण; पाठलागादरम्यान झालेल्या अपघातात ६ जण जखमी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

कर्नाटकची राजधानी बेंगळुरूधून एक अत्यंत खळबळजनक आणि थरारक घटना समोर आली आहे. प्रेमविवाह केल्याच्या रागातून माहेरच्या मंडळींनी आपल्याच मुलीचे बळजबरीने अपहरण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुलीला पळवून नेत असताना आरोपींनी भरधाव वेगाने कार चालवली आणि रस्त्यावरील अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ६ जण गंभीर जखमी झाले असून एका ५७ वर्षीय महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने ती अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार, राजस्थानमधील मेलवास गावची रहिवासी असलेली २१ वर्षीय पूजा हिने सुमारे ८ ते ९ महिन्यांपूर्वी २३ वर्षीय ओम प्रकाश या तरुणाशी कुटुंबाच्या मर्जीविरुद्ध जाऊन प्रेमविवाह केला होता. लग्नानंतर हे जोडपे बेंगळुरू गाठून येथील अग्रहरा दसरहल्ली परिसरात वास्तव्य करत होते.

पूजाच्या घरच्यांचा या विवाहाला विरोध होता. दरम्यान, पूजाचे कुटुंबिय आणि नातेवाईक मिळून चार जण थेट अग्रहरा दसरहल्ली येथे पोहोचले. त्यांनी पूजाला तिच्या घरातून बळजबरीने उचलले आणि कारमध्ये कोंबून पळून जाण्याचा प्रयत्न केला. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आरोपी अत्यंत निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात कार चालवत होते. या पळापळीच्या नादात त्यांची कार वाटेतील अनेक वाहनांना धडकली. या भीषण साखळी अपघातात सहा नागरिक जखमी झाले. अपघातात जखमी झालेल्यांची नावे: १. पृथ्वीराज (वय १२ वर्षे) २. यशिका (वय ९ वर्षे) ३. अमुल (वय ३५ वर्षे) ४. मणि (वय ६४ वर्षे) ५. जयलक्ष्मी (वय ५७ वर्षे, डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने आयसीयूमध्ये दाखल) ६. संतोष (वय ३३ वर्षे) या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सूत्रे हलवली आणि राजस्थानचे रहिवासी असलेले राकेश (३१), करण (२५) आणि अयान (१८) या तीन जणांना ताब्यात घेतले आहे. मात्र, घटनेच्या वेळी कार चालवणारा मुख्य आरोपी सद्दाम हा अद्याप फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. तसेच, या अपहरणात आणि अपघातात वापरण्यात आलेली कार पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतली आहे.

## सारांश वृत्त

### जीएसटीचे बिल कोणी भरायचे यावरुन झालेल्या वादात तरुणाने छातीत कात्रीने मारुन कर्मचाऱ्याला केले गंभीर जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

कंपनी सुरु करुन फरशी बसविण्याचे काम दोघांनी पूर्वी एकत्र केले. त्यावेळी केलेल्या कामाचे जीएसटीचे पैसे कोणी भरायचे यावरुन झालेल्या वादात साडूच्या मुलाने छातीत लोखंडी कात्रीने वार करुन कर्मचार्याला गंभीर जखमी केल्याचा प्रकार समोर आला आहे. राजेंद्र दशरथ जाधव (वय ५०, रा. मळाई पार्क, फुरसुंगी) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी विशाल रामदास जाधव (वय २५, रा. मळाई पार्क, फुरसुंगी) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार मळाई पार्क येथील श्री साई विश्व स्कुलचे समोर १४ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजता घडला. राजेंद्र जाधव यांच्यावर ससुन रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र जाधव हे फरशी बसविण्याचे काम करतात. त्यांचा मुलगा सुरज हा वॉटर प्रुफींगचे काम करतो. त्यांचा साडु रामदास जाधव, मेहुणी आशा जाधव व त्यांचा मुलगा विशाल जाधव हे २ वर्षांपासून त्यांच्याजवळ राहण्यास आले आहेत. सुरज व मेहुण्याचा मुलगा विशाल यांनी त्यावेळी वॉटर प्रुफींगचे काम करण्याच्या उद्देशाने श्री स्वामी समर्थ वॉटर प्रुफींग या नावाने एजन्सी चालू केली होती. ही एजन्सी नोंदणी करण्यासाठी ४५ हजार रुपये खर्च दोघांनी केला होता. वर्षभर एकत्र काम केले. विशाल हा काही कामे स्वत: करुन स्वत: फायदा घेत आहे, असे समजले. त्यावरुन सुरज व विशाल यांच्यात वाद होऊन दोघे वेगळे झाले.

मागील केलेल्या कामाचे जीएसटी चे दीड लाख रुपये भरायेच आहेत. त्यावेळी सुरज म्हणाला की, विशाल तू सर्व एजन्सी स्वत: चे नावे करुन, स्वत: फायदा घेतला आहेस व आता जीएसटी आम्ही का भरु.

# रुपया ९६ पार घसरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

अमेरिकेतील व्याजदरवाढीच्या पार्श्वभूमीवर आशियातील बहुतांश चलनांवर दबाव असताना भारतीय रुपयाने गुरुवारी मोठी घसरण टाळत व्यवहाराचा शेवट जवळपास स्थिर पातळीवर केला. सुरुवातीच्या व्यवहारात रुपया प्रति डॉलर ९६ रुपयांच्या पातळीखाली घसरला, मात्र संभाव्य मध्यवर्ती बँकेच्या हस्तक्षेपामुळे आणि जागतिक इक्विटी निर्देशांकाच्या पुनर्संतुलनाशी संबंधित भांडवली ओघामुळे रुपयाला आधार मिळाला.

गुरुवारी रुपया प्रति डॉलर ९५.९३ या पातळीवर बंद झाला. बुधवारी तो ९५.९५५० वर बंद झाला होता. म्हणजेच दिवसअखेरीस रुपयातील बदल अत्यंत किरकोळ राहिला. मात्र, दिवसातील सुरुवातीची घसरण लक्षात घेता रुपयाने नुकसान मोठ्या प्रमाणात भरून काढले.

अमेरिकेतील व्याजदरवाढीमुळे डॉलरला मागणी वाढण्याची शक्यता असते. त्याचा परिणाम उदयोन्मुख बाजारपेठांच्या चलनांवर होऊ शकतो. भारतासाठी ही परिस्थिती विशेष महत्त्वाची आहे, कारण रुपयावरील दबाव वाढल्यास कच्च्या तेलाच्या आयातीचा खर्च, इंधन दर, महागाई आणि देशाच्या



आयात बिलावर परिणाम होऊ शकतो. बाजारातील हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मते, रुपया ९६ च्या पातळीपलीकडे घसरल्यानंतर संभाव्य रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामुळे डॉलरची मागणी नियंत्रित झाली आणि रुपयाला आधार मिळाला. याशिवाय जागतिक इक्विटी निर्देशांकाच्या पुनर्संतुलनामुळे भारताशी संबंधित समभागांमध्ये झालेल्या संभाव्य भांडवली प्रवाहाचाही रुपयाला फायदा झाला.

मात्र, दिवसअखेरीस रुपया स्थिर राहिला म्हणून दबाव संपला असे मानणे घाईचे ठरेल. ९६ रुपयांची डॉलरविरुद्धची पातळी पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. अमेरिकेचे व्याजदर, परदेशी गुंतवणुकीचा प्रवाह, तेलाच्या किंमती आणि रिझर्व्ह बँकेची बाजारातील भूमिका हे घटक आगामी काळात रुपयाची दिशा ठरवणार आहेत. त्यामुळे आजची स्थिरता ही दीर्घकालीन सुधारणा आहे की तात्पुरता आधार, याकडे बाजाराचे लक्ष राहणार आहे.

## परदेशी डेबिट कार्डमधून निधीचा कथित खेळ; ‘टिमोथी इनिशिएटिव्ह’सह सात जणांवर सीबीआयचा गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

अमेरिकास्थित ‘द टिमोथी इनिशिएटिव्ह’ या आंतरराष्ट्रीय ख्रिश्चन इव्हँजेलिकल संस्थेसह सात जणांविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) परदेशातून भारतात निधी वळविल्याच्या कथित प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, हा निधी परदेशी डेबिट कार्डच्या माध्यमातून भारतात आणला गेल्याचा आरोप असून, डाव्या अतिरेकी हिंसाचाराने प्रभावित भागांपर्यंतही तो पोहोचल्याचा संशय तपास यंत्रणेने व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ आर्थिक व्यवहार म्हणून नव्हे, तर परदेशी निधीच्या वापराशी संबंधित गंभीर नियामक प्रश्न म्हणून पाहिले जात आहे.

या प्रकरणातील आरोपींमध्ये ‘द टिमोथी इनिशिएटिव्ह’बरोबरच बंगळुरूतील जोनाथन एस. राजन, मिकाह मार्क आणि अजित वर्गीस मथाई, म्हैसूर येथील सुप्रीम जॉय, आसाममधील गोलपारा येथील बाबलू कुर्मी आणि छत्तीसगडमधील धमतरी येथील वर्गीस चाको यांचा समावेश आहे. सीबीआयने दाखल केलेल्या प्रथम माहिती अहवालात या सर्वांची नावे आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमीही महत्त्वाची आहे. अंमलबजावणी संचालनालयाकडून (ईडी) मिळालेल्या माहितीनंतर सीबीआयने तपास सुरू केल्याचे समोर आले आहे. परदेशी स्रोतांकडून मिळणाऱ्या योगदानाच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या *परकीय योगदान नियमन कायद्या (एफसीआरए)*सह माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदी आरोपींविरोधात लागू करण्यात आल्या आहेत.

परदेशी निधी भारतात कोणत्या मार्गाने आला, त्यासाठी परदेशी डेबिट कार्डचा नेमका कसा वापर झाला, निधीचा अंतिम लाभार्थी कोण होता आणि तो कोणत्या कारणासाठी खर्च करण्यात आला, याचा तपास आता सीबीआयकडून केला जाणार आहे. विशेषतः डाव्या अतिरेकी हिंसाचारग्रस्त भागांपर्यंत निधी पोहोचल्याचा आरोप असल्याने तपासाचे स्वरूप अधिक संवेदनशील बनले आहे. मात्र, एफआयआरमध्ये झालेले आरोप हे तपासाचा भाग असून, त्यांची न्यायालयीन पातळीवर अद्याप सिद्धता झालेली नाही.

## रशियाकडून तेल घेतल्याची किंमत? अमेरिकेच्या १०० टक्के टॅरिफच्या तलवारीखाली भारत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर तब्बल १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त आयातशुल्क लावण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या अमेरिकेच्या नव्या विधेयकामुळे भारतासमोर मोठे आर्थिक आणि राजनैतिक आव्हान उभे राहिले आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने ‘लिंडसे ओ. ग्रॅहम सॅन्क्शनिंग रशिया अँड इराण अ‍ॅक्ट २०२६’ मंजूर केला असून, आता हे विधेयक राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आले आहे. प्रतिनिधीगृहात हे विधेयक २६२ विरुद्ध १५१ मतांनी मंजूर झाले. याआधी अमेरिकी सिनेटनेही ते मंजूर केले होते.

विधेयकाचे स्वरूप लक्षात घेतले तर त्याचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा धोरणावर होऊ




शकतो. रशियन तेल आणि वायूची खरेदी सुरू ठेवणाऱ्या प्रमुख आयातदार देशांवर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना १०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याचा अधिकार देण्याची तरतूद यात आहे. भारत आणि चीन हे रशियन कच्च्या तेलाचे मोठे खरेदीदार असल्याने दोन्ही देश या तरतुदीच्या कक्षेत येऊ शकतात. मात्र, १०० टक्के टॅरिफ भारतावर तातडीने लागू झाला आहे, असे समजणे चुकीचे ठरेल; सध्या विधेयक राष्ट्राध्यक्षांच्या निर्णयाच्या टप्प्यावर आहे.

या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने सावध भूमिका घेतली आहे. भारताने विधेयकाच्या मंजुरीची दखल घेतली असून, पुढील घडामोडींवर लक्ष ठेवले जात असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. अमेरिकेतील विविध संबंधित व्यक्तींशी भारताने हा मुद्दा चर्चिल्याचेही सांगण्यात आले आहे. त्याचवेळी भारताने आपल्या व्यापार आणि आर्थिक हितांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या संपूर्ण संघर्षाच्या केंद्रस्थानी मात्र एक मूलभूत प्रश्न आहेभारताने स्वस्त आणि उपलब्ध रशियन ऊर्जेची खरेदी करायची की अमेरिकेच्या संभाव्य व्यापारदबावाचा विचार करून ऊर्जा पुरवठ्याची दिशा बदलायची? भारत सरकारने यापूर्वीही ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देत पुरवठ्याचे स्रोत विविध ठेवण्याची भूमिका मांडली आहे. त्यामुळे पुढील निर्णय केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय राहणार नाही, तर इंधनाच्या किंमती, उद्योग, महागाई आणि भारत-अमेरिका व्यापारावरही त्याचे परिणाम होऊ शकतात.

## टाटा समूहात मोठा निर्णय; एन. चंद्रशेखरन यांची पुन्हा पाच वर्षांसाठी अध्यक्षपदी नियुक्ती, ‘लिस्टिंग’चा मार्गही खुला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारताच्या उद्योग विश्वातील आघाडीच्या टाटा समूहाने गुरुवारी मोठा संस्थात्मक निर्णय घेत एन. चंद्रशेखरन यांची टाटा सन्सच्या अध्यक्षपदी आणखी पाच वर्षांसाठी पुनर्नियुक्ती केली. त्याचबरोबर टाटा सन्सच्या संभाव्य सार्वजनिक लिस्टिंगचा विचार करण्यासही संचालक मंडळाने पाठिंबा दिला. १५८ वर्षांच्या टाटा समूहाच्या भविष्यातील दिशा आणि प्रशासनाच्या दृष्टीने हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे.

चंद्रशेखरन यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने तंत्रज्ञान, उत्पादन, सेमीकंडक्टर, विमान वाहतूक आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये विस्ताराची भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे समूहाच्या दीर्घकालीन धोरणांमध्ये सातत्य राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



मात्र, या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर टाटा समूहाच्या संचालक मंडळातील मतभेदही स्पष्टपणे समोर आले आहेत. टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला तसेच टाटा सन्सच्या संभाव्य सार्वजनिक लिस्टिंगच्या प्रस्तावाला विरोध केला. टाटा ट्रस्ट्सकडे टाटा सन्समध्ये सुमारे ६६ टक्के हिस्सा आहे. त्यामुळे समूहाच्या नियंत्रणरचनेत ट्रस्ट्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

चंद्रशेखरन आणि नोएल टाटा यांच्या नेतृत्वाखालील टाटा ट्रस्ट्समध्ये टाटा सन्सच्या संभाव्य लिस्टिंगपासून एअर इंडियाच्या वाढत्या तोट्यापर्यंत तसेच अल्पांश भागधारकाच्या संभाव्य बाहेर पडण्यासारख्या मुद्द्यांवर मतभेद झाल्याचे वृत्त आहे.

तरीही, गुरुवारच्या निर्णयातून टाटा समूहाने नेतृत्वातील सातत्य आणि भविष्यातील भांडवली विस्तारासाठी पर्याय खुले ठेवण्याचा स्पष्ट संकेत दिला आहे. टाटा सन्सची संभाव्य लिस्टिंग प्रत्यक्षात कधी आणि कोणत्या स्वरूपात होईल, हे अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र, देशातील सर्वाधिक प्रतिष्ठित उद्योगसमूहांपैकी एक असलेल्या टाटांनी भविष्यातील वाढीसाठी संस्थात्मक रचना आणि भांडवली बाजाराचा पर्याय चर्चेत ठेवणे, ही उद्योगविश्वासाठी महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

## तांदळाच्या उत्पादनाला दोन दशकांतील मोठा फटका; विक्रमी साठ्यामुळे निर्यातीला मात्र आधार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठ्या तांदूळ उत्पादक आणि निर्यातदार देशांपैकी भारताच्या तांदूळ उत्पादनाला यंदा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. २०२६-२७ या हंगामात भारताचे तांदूळ उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १ कोटी मेट्रिक टनांनी घटू शकते, असा अंदाज उद्योग क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. जवळपास दोन दशकांतील ही सर्वात मोठी उत्पादनघट ठरण्याची शक्यता आहे.

तांदळाच्या पिकाच्या वाढीच्या आणि परिपक्वतेच्या महत्त्वाच्या टप्प्यात अनेक प्रमुख उत्पादक राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे. काही तांदूळ उत्पादक भागांमध्ये पर्जन्यमानात तब्बल ४२ टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे उत्पादनक्षमता अर्थात प्रति हेक्टर मिळणारे उत्पन्न कमी होण्याची शक्यता आहे.

राईस एक्सपोर्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. व्ही. कृष्णा राव यांच्या मते, कमी पावसामुळे उत्पादनात घट होईल आणि यंदा उत्पादन सुमारे १० दशलक्ष मेट्रिक टनांनी कमी होण्याचा अंदाज आहे. गेल्या दशकात



प्रथमच भारताच्या तांदूळ उत्पादनात वार्षिक घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

उत्पादन घटल्याने देशांतर्गत बाजारात तांदळाच्या किंमती वाढण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो. त्याचवेळी थायलंड आणि व्हिएतनामसारख्या प्रमुख निर्यातदार देशांमध्येही तांदळाच्या किंमती वाढत असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय तांदळाची किंमत अधिक स्पर्धात्मक ठेवण्याचे आव्हान निर्माण होऊ शकते.

मात्र, यंदाच्या उत्पादनघटीला भारताकडे असलेला विक्रमी तांदूळ साठा मोठा आधार ठरू शकतो. मागील काही वर्षांतील विक्रमी उत्पादनामुळे सरकारी आणि व्यापारी साठे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यामुळे उत्पादन कमी झाले तरी देशांतर्गत गरजा भागवतानाच भारताला निर्यात सुरू ठेवता येण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, या साठ्यामुळे सरकारला सध्या निर्यातीवर मोठे निर्बंध आणण्याची गरज भासणार नाही, असा उद्योगक्षेत्राचा अंदाज आहे.

मात्र, पुढील काही महिन्यांत पावसाची स्थिती, उत्पादनाचे अंतिम आकडे, देशांतर्गत किंमती आणि जागतिक मागणी यावर भारताच्या तांदूळ बाजाराची दिशा अवलंबून राहणार आहे. उत्पादनातील मोठी घट आणि विक्रमी साठा यांच्यातील समतोल भारताच्या अन्नसुरक्षेसाठी तसेच निर्यात धोरणासाठी निर्णायक ठरणार आहे.

## सात जीव गेले, आता अनुभवी आवाजही नको? किरण बेदींच्या हस्तक्षेपाला विरोधावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

सत्य निकेतनमधील पीजी इमारत कोसळून सात जणांचा मृत्यू झाल्यानंतर दिल्लीतील बांधकाम सुरक्षा, पीजी व्यवस्थापन आणि प्रशासकीय देखरेखीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात प्रकरणात हस्तक्षेप करून न्यायालयाला मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र केंद्र सरकार, दिल्ली सरकार आणि दिल्ली महानगरपालिकेने त्यांच्या हस्तक्षेपाला विरोध केला. सरकारच्या वतीने त्यांच्याकडून प्रकरणातील मुद्द्यांवर आधीच निष्कर्ष काढला जात असल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

इथेच प्रश्न निर्माण होतोजर एखादी अनुभवी माजी प्रशासकीय अधिकारी न्यायालयाला मदत करण्यासाठी पुढे येत असेल, तर तिच्या अनुभवाचा उपयोग करून घेण्यास आक्षेप नेमका का?

दिल्ली उच्च न्यायालयाने मात्र बेदी या जागरूक नागरिक असून त्यांचा दीर्घ प्रशासकीय अनुभव या व्यापक जनहिताच्या प्रकरणात उपयोगी ठरू शकतो, असे स्पष्ट केले. न्यायालयाने सरकारला प्रकरणाकडे ‘रर्वींशर्ळीरॲळरश्र’ पद्धतीने पाहू नये, असेही सूचित केले.

याचा अर्थ केंद्र सरकार घाबरले आहे, असा निष्कर्ष आत्ताच काढणे योग्य ठरणार नाही. पण सरकारच्या विरोधाची कारणमीमांसा सार्वजनिक हिताच्या कसोटीवर तपासली जाणे निश्चितच आवश्यक आहे. कारण बेदींना या प्रकरणात कोणत्याही यंत्रणेची चौकशी स्वतः करण्याचा अधिकार मागितलेला नाही; त्यांचा दावा न्यायालयीन प्रक्रियेला मदत करण्याचा आहे.

आणि ही मदत महत्त्वाची ठरू शकते. पोलिस प्रशासन, दिल्लीतील विविध स्तरांवरील प्रशासकीय व्यवस्था आणि सार्वजनिक संस्थांमध्ये काम केलेल्या अधिकाऱ्याला नियम प्रत्यक्षात कसे लागू होतात,



परवानग्या आणि तपासण्या कुठे अडकतात, विविध यंत्रणांमध्ये समन्वय का अपुरा पडतो, याचे व्यवहारातील आकलन असू शकते. न्यायालयानेही त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा उपयोग होऊ शकतो, असेच निरीक्षण नोंदवले आहे.

या दुर्घटनेवर न्यायालयाने आधीच अत्यंत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. सात जणांचा बळी गेलेला हा प्रकार सामान्य दुर्घटना नसून संबंधित यंत्रणांच्या निष्काळजी आणि गंभीर वर्तनाचा परिणाम असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

मग तपासाचा परीघ अधिक व्यापक करण्यासाठी अनुभवी प्रशासकीय दृष्टिकोन उपलब्ध होत असेल, तर त्याला प्रक्रियात्मक कारणांपलीकडे जाऊन विरोध करण्याची गरज आहे का?

किरण बेदी दोषनिश्चिती करण्यासाठी नव्हे, तर न्यायालयाला मदत करण्यासाठी येत असतील, तर त्यांच्या अनुभवाची भीती कशाला?

अर्थात, अंतिम निर्णय न्यायालयाचाच असेल. बेदींची भूमिका पूर्वग्रहदूषित आहे की नाही, त्यांच्याकडे कोणती माहिती आहे आणि त्यांचा हस्तक्षेप कायदेशीरदृष्ट्या आवश्यक आहे का, हे न्यायालय ठरवेल. पण या प्रकरणाने एक मूलभूत प्रश्न पुढे आणला आहेप्रशासनाच्या अपयशाची चौकशी होत असताना प्रशासनाबाहेरील अनुभवी आणि स्वतंत्र दृष्टिकोनाला दार बंद करणे जनहितासाठी योग्य ठरेल का? सत्य निकेतनमधील सात मृत्यूंची खरी जबाबदारी निश्चित करायची असेल, तर तपासाला सर्व संबंधित स्तरांपर्यंत पोहोचावे लागेल. व्यक्ती कोण आहे यापेक्षा तिच्याकडे तपासाला उपयोगी पडणारा अनुभव काय आहे, हा प्रश्न महत्त्वाचा असायला हवा.